THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 12TH JANUARY 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation*

## PART IX.—Marathi Acts, &c

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजा गव्हर्नर यांनीं तारीख २१ माहे जूलै सन १८९२ रोजीं आणि आलीजा बहादुर व्हायसराय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २५ माहे आक्टोबर सन १८९२ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असेः—

### सन १८९२ चा मुंबईचा आक्ट नंबर ३.

**सन १८७८ चा मुंबईचा आबकारी आक्ट सुधारण्यासाठीं आक्ट.**

**(गव्हर्नर जनरल यांनीं या आक्टास दिलेली मंजुरी मुंबईचे गव्हर्नर यांनीं तारीख ८ माहे डिसेंबर सन १८९२ रोजीं प्रसिद्ध केली.)**

उपोद्घात.

ज्या अर्थी सन १८७८ चा मुंबईचा आबकारी आक्ट सुधारणें योग्य आहे ; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः

लहान सरनामा.

१. या आक्टास "सन १८९२ चा मुंबईचा आबकारी आक्ट सुधारण्याविषयीं आक्ट" असें ह्मणावें, आणि हा आक्ट, सन १८७८ चा मुंबईचा आबकारी आक्ट कीं ज्यास या आक्टांत पुढें सदर्हू आक्ट असें ह्मटलें आहे, त्याचा भाग आहे असें समजून या आक्टाचा अर्थ करावा.

कलम ३ यांत नवीन रकम दाखल करणें.

१ अ. सदर्हू आक्टाच्या ३ऱ्या कलमांत खालीं लिहिलेली रकम जास्त दाखल करावी; ती रकम येणेंप्रमाणेंः—

"(१३) 'मोहाचें फूल' ह्या संज्ञेंत मोहाच्या झाडाच्या फळाचा अगर बीचा समावेश होत नाहीं असें समजावें".

१८व्या कलमानंतर व १९ व्या कलमापूर्वीं नवीन कलम दाखल करणें.

२. सदर्हू आक्टाच्या १८ व्या व १९ व्या कलमांच्या दरमियान खालीं लिहिलेलें कलम १८ अ ह्मणून दाखल करावें.

'५-अ.—मोहाच्या फुलांबाबद विशेष ठराव.'

"१८ अ. (१) पोटकलम (३) यांत सांगितलेला प्रसंग शिवाय करून इतर कोणत्याहि प्रसंगीं, कलेक्टरानें अगर या बाबतींत योग्य रीतीनें अधिकार मिळालेल्या

इतर अमलदारानें दिलेल्या लैसेन्साच्या, परवान्याच्या अगर पासाच्या आधाराशिवाय व त्यांतील अटींच्या व शर्तींच्या बाहेर कोणत्याहि मनुष्यानें कोणत्याहि ठरींव प्रदेशांतून अगर प्रदेशांत ठरींव वजनापेक्षां जास्त मोहाचीं फुलें बाहेर पाठवूं नयेत अगर आणूं नयेत, अगर त्या ठरींव प्रदेशांत त्या ठरींव वजनापेक्षां जास्त फुलें गोळा करूं नयेत, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊं नयेत, विकूं नयेत अगर आपल्या कबज्यांत ठेवूं नयेत.

"(२) ह्या कलमांत "ठरींव प्रदेश" ह्या संज्ञेचा अर्थ, गव्हर्नर इन् कौन्सिल हे वेळोवेळीं या संबंधानें जाहीर करितील त्याप्रमाणें ठाणें व कुलाबा हे सगळे जिल्हे अगर त्यांचा कांहीं भाग असा समजावा, आणि "ठरींव वजन" ह्या संज्ञेचा अर्थ चार शेर, अगर गव्हर्नर इन् कौन्सिल हे या संबंधानें वेळोवेळीं जाहीर करितील तें कोणतेंहि जास्त मोठें परिमाण, असा समजावा.

"(३) मात्र इतकेंच कीं, प्रत्येक वर्षी तारीख १६ माहे फेब्रुवारीपासून तारीख १९ माहे एप्रिलपर्यंतच्या दोन महिन्यांमध्यें, अगर गव्हर्नर इन् कौन्सिल हे वेळोवेळीं मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा देऊन फर्मावितील त्या, सदर्हू दोन महिने धरून, कोणत्याहि जास्त मुदतीमध्यें, कल्याण, भिंवडी, कर्जत, मुरबाड, शाहापुर आणि वाडें ह्या तालुक्यांच्या हद्दींच्या आंत कोणत्याहि ठिकाणीं, अगर गव्हर्नर इन् कौन्सिल यांस ठरींव प्रदेशांतला जो कोणताहि इतर भाग सदर्हूप्रमाणें जाहिरनामा देऊन निर्दिष्ट करणें योग्य आहे असें वाटेल त्या भागाच्या आंत कोणत्याहि ठिकाणीं, त्या वर्षाचीं आणि सदर्हू तालुक्यांतलीं अगर त्यांपैकीं कोणत्याहि एका किंवा अधिक तालुक्यांतलीं, अगर ठरींव प्रदेशांतील कोणताहि इतर भाग सदर्हूप्रमाणें निर्दिष्ट केलेला असल्यास त्या भागांतलीं कितीहि मोहाचीं फुलें गोळा करण्याबद्दल, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल, विकण्याबद्दल अगर कबज्यांत ठेवण्याबद्दल लैसेन्साची, परवान्याची अगर पासाची जरूरी लागणार नाहीं."

कलम ३० यांत विशेष ठराव दाखल करणें.

२ अ. सदर्हू आक्टाच्या ३०व्या कलमांत खालीं लिहिलेला विशेष ठराव दाखल करावा; तो येणेंप्रमाणें :—

"मात्र इतकेंच कीं, कलम १८ अ अन्वयें मोहाच्या फुलांबाबद द्यावयाच्या कोणत्याहि लैसेन्साबद्दल, परवान्याबद्दल अगर पासाबद्दल फी बिलकुल घेऊं नये."

४३व्या कलमांत नवीन पोट-कलम दाखल करणें.

३. सदर्हू आक्टाचें चालू कलम ४३ यास ४३व्या कलमाचें पोट-कलम (१) असें ह्मणून त्या कलमांत, खालीं दिलेला मजकूर पोट-कलम (२) ह्मणून दाखल करावा; तो येणेंप्रमाणें :—

"(२) जो कोणी ह्या आक्टाचें अगर ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूचें अगर हुकुमाचें, अगर ह्या आक्टाअन्वयें दिलेल्या कोणत्याहि लैसेन्साचें, परवान्याचें अगर पासाचें उल्लंघन करून मोहाचीं फुलें आणील, बाहेर पाठवील, गोळा करील, एका जागेहून दुसऱ्या जागीं नेईल, विकील अगर आपल्या कबज्यांत ठेवील, त्यास अशा प्रत्येक अपराधाबद्दल पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडाची अगर पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत कैदेची शिक्षा होईल अगर दोन्ही शिक्षा होतील: मात्र इतकेंच कीं, जीं कोणतींहि मोहाचीं फुलें झाडावर असतील अगर झाडावरून जमिनीवर पडून गोळा केलेलीं नसतील तशा फुलांच्या संबंधानें कोणत्याहि मनुष्यास शिक्षा होणार नाहीं."

५३व्या कलमाची सुधारणूक.

४. सदर्हू आक्टाच्या ५३व्या कलमाच्या १ल्या पारिग्राफांत, "आऊत किंवा संच" व "आउताबाबद किंवा संचाबाबद" या शब्दांच्या नंतर अनुक्रमें खालीं लिहिलेले शब्द दाखल करावे, ह्मणजे :—

"अथवा मोहाचीं फुलें" व "किंवा मोहाच्या फुलांबाबद";

५. (१) सदर्हू आक्टाच्या १४व्या कलमांत,— ५४ व्या कलमाची सुधारणूक.

(अ) १ ल्या पारिग्राफांत, " सर्व दारू" व " किंवा कैफ आणणारीं द्रव्यें" या शब्दांच्या दरमियान " मोहाचीं फुलें " हे शब्द दाखल करावे;

(ब) ३ऱ्या पारिग्राफांत, " दारूसोबत किंवा दारूखेरीज आणखी" व " किंवा कैफ आणणारे " या शब्दांच्या दरमियान " किंवा मोहाच्या फुलांसोबत किंवा फुलांखेरीज आणखी " हे शब्द दाखल करावे; आणि

(क) "सदर्हू प्रकारची " हे शब्द ज्या पारिग्राफाच्या आरंभीं आहेत त्या पारिग्राफांत, "कोणतीहि दारू " आणि " किंवा कैफ आणणारें द्रव्य " या शब्दांच्या दरमियान " किंवा मोहाचीं फुलें " हे शब्द दाखल करावे.

(२) ३ऱ्या पारिग्राफांत " (असल्यास ती) सर्व दारू " आणि "व कैफ आणणारीं सर्व द्रव्यें " या शब्दांच्या दरमियान " सर्व मोहाचीं फुलें " हे शब्द दाखल करावे.

६. मोहाच्या फुलांस जंगलाचें उत्पन्न या नात्यानें जो कोणताहि विवक्षित काळीं अमलांत असलेला, कायदा लागू असेल अगर विवक्षितकाळीं कायद्याप्रमाणें अमलांत असलेली जी कोणतीहि कानू लागू असेल, त्या कायद्याच्या अगर कानूच्या अमलास ह्या आक्टांतील कोणत्याहि ठरावानें बाध येणार नाहीं. कायम ठेवणारें कलम.

मुक्काम नजिरे मुंबई तारीख ६ माहे डिसेंबर सन १८९२.

आलीजा धि रैट ऑनरेबल धि गव्हर्नर
इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) सी. एच. ए. हिल,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू
करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.